# दि.२६/०७/२०१८ ला स्क्रॅप (भंगार) बसेस च्या लिलावाबाबत घेण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त

दि. २६/०७/२०१८ रोजी मा. श्री. प्रविण भिसीकर, अध्यक्ष लिलाव समिती यांनी व्हि. एन. आय.एल. यांच्या मालकीच्या व सध्या भंगार अवस्थेत असलेल्या २३० बसेसचे लिलाव करण्याकरीता डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती कक्ष (स्थायी समिती सभागृह) येथे आढावा सभा घेतली. या सभेला समितीचे खालील मा. सदस्य व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

१. मा. श्री. प्रविण भिसीकर, अध्यक्ष
२. मा. श्री. नितिन साठवणे, सदस्य
३. मा. सौ. अर्चना पाठक, सदस्य
४. श्री. शिवाजी जगताप, परिवहन व्यवस्थापक
५. श्री. रविंद्र पागे, प्रशासकिय अधिकारी
६. श्री. अरुण पिपरुडे, कामगार अधिकारी
७. श्री. सुकीर सोनटक्के, वाहतुक व्यवस्थापक
८. श्री. विनय भारद्वाज, लेखा अधिकारी
९. श्री. योगेश रा. लुंगे, यांत्रिकी अभियंता

मा. अध्यक्ष यांनी सभेला सुरवात केली व खालील मुद्यांवर सांगोपांग चर्चा करुन कार्यवाहीस्तव आदेशित केले.

**अध्यक्ष :-** मा. अध्यक्षांनी नमुद केले की लिलाव समितीचे गठन होवून ७ महिने झाले असून ज्याप्रमाणात लिलावाची कार्यवाही होणे अपेक्षित होते त्याप्रमाणे झालेले नाही. मे. व्हि. एन. आय.एल. यांनी या स्क्रॅप बसेसचे लिलाव करण्याकरीता संमतीपत्र दिलेले आहे. सध्या हे प्रकरण जिल्हा न्यायालयात सुरु असून निकालाअंती मनपा व मे. व्हि. एन. आय.एल. या दोघांनाही सारखा भुर्दंड बसणार असून फायदा तिसऱ्यालाच होईल. मे. वंश निमय च्या मालकीच्या एकंदर किती बसेस आहेत याची माहिती, बस नंबर, चेसिस नं, इंजिन नं. सह बायफरकेशन चार्ट तयार करुन दि. ३१/०७/२०१८ पुर्वी सादर करावे.

लिलावाकरीता काढण्यात आलेल्या २३० भंगार बसेस सध्या कोणकोणत्या डेपोमध्ये उभ्या आहेत त्यांचे बस नंबर, चेसिस नं, इंजिन नं. सह विस्तृत माहिती स्वतंत्र तक्त्यामध्ये दि. ३१/०७/२०१८ पुर्वी सादर करणे.

**परिवहन व्यवस्थापक :-** परिवहन व्यवस्थापक यांनी २३० बसेसचे लिलाव करण्याकरीता व ऑफसेट व्हॅल्यू निश्चित करण्याकरीता केलेल्या कार्यवाहीबाबत नमुद केले की मा. आयुक्त यांचेद्वारे अर्धशासकीय पत्राद्वारे मा. उपाध्यक्ष तथा मॅनेजिंग डायरेक्टर, एम.एस.आर.टी.सी. मुंबई यांना जबाबदार व अनुभवी अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची विनंती केलेली आहे. तसेच महाव्यवस्थापक यांनासुद्धा परिवहन

व्यवस्थापकातर्फे विनंती केलेली आहे. तथापि त्यांचे पत्र दि.१७/०७/२०१८ अन्वये त्यांनी या कामाकरीता अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची असमर्थता दर्शविलेली आहे.

या संदर्भात मा. अध्यक्ष यांनी सूचित केले की ४ नामांकीत सरकारी विमा कंपनींकडून या सर्व वाहनांची ऑफसेट व्हॅयल्यू काढून त्यांचे किंमत ठरवित असल्यामुळे या सर्वांना मनपाच्या २३० भंगार गाडयांची ऑफसेट व्हॅल्यू काढण्याबाबत पत्र पाठविण्यात यावे. तसेच काढण्यात आलेली ऑफसेट व्हॅल्यु ही अत्यंत गोपनिय ठेवण्यात यावी आणि त्याकरिता या उप समिती अंर्तगत ही जबाबदारी श्री. योगेश रा. लुंगे, तात्रिंक अभियंता यांना देण्यात येत आहे, असे परिवहन व्यवस्थापक यांनी नमुद केले. तसेच उक्त प्रक्रिया सुचारूपणे राबविण्याकरिता प्रशासकीय स्तरावर श्री. रविंद्र पागे, प्रशासकीय अधिकारी, श्री. विनय भारद्वाज, लेखा अधिकारी हे परिवहन व्यवस्थापक यांना सहकार्य करतील.

याकरीता या पथकाने या २३० भंगार गाडयांचे पद्धतशीरपणे व्हिडिओग्राफी सह प्रत्येक गाडीची वेगळी नस्ती तयार करुन अभिप्राय परिवहन व्यवस्थापक यांना सादर करतील. सदर कार्य हे दि. १०/०८/२०१८ पर्यंत पुर्ण करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येईल. यानंतर प्राप्त झालेल्या माहितीनुसार परिवहन व्यवस्थापक यांचे मार्फत ई ऑक्शनची कार्यवाही करण्यात येईल.

मा. अध्यक्ष :- उपरोक्त सर्व कार्यवाही वेळेत पूर्ण करुन पुढील बैठकीच्या आधी सादर करावे. पुढील बैठक येत्या १०-१२ दिवसात घेण्यात येईल.

अध्यक्ष
उप समिती

परिवहन व्यवस्थापक,
परिवहन विभाग